# बडीकॉप

- **प्रस्तावना :-**

पुणे शहरात नजीकच्या काळामध्ये महिला सुरक्षिततेच्या अनुषंगाने काही महत्त्वपुर्ण लक्ष वेधणा-या घटना घडल्या ज्यामध्ये दोन तरुणींना अंतरा दास, रसिला राजू यांना आपला जीव गमवावा लागला. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये व वेळेवर त्यास प्रतिबंध व्हावा याकरिता पुणे शहर पोलीसांद्वारे बडीकॉप हा महिला सुरक्षेसंबंधीचा उपक्रम सुरु करण्यात आला. 'बडी' म्हणजे मित्र व 'कॉप' म्हणजे पोलीस की जो महिलांच्या सुरक्षेसाठी **२४x७** तास प्रतिसाद देण्याकरिता उपलब्ध असेल. प्रायोगिक तत्वावर आयटी हब असलेल्या हिंजवडी, हडपसर, येरवडा व विमानतळ या ४ पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात हा उपक्रम सुरु करण्यात आलेला असून सध्या परिमंडळ-३ व परिमंडळ ४ मधील एकुण १९ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील नोकर पेशा महिलांसाठी सुरु आहे. लवकरच संपुर्ण आयुक्तालयामधील पोलीस स्टेशनचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. **बडी कॉप ही संकल्पना ०८/०३/२०१७ रोजी महिला दिनाच्या निमित्ताने उदयास आणली.**

- **बडी कॉप उपक्रमाची सुरवात दि ०८ मार्च २०१७ रोजी मा. पोलीस आयुक्त पुणे शहर रश्मी शुक्ला मॅडम यांच्या हस्ते सदर उपक्रमाची सुरवात करण्यात आली.**
- **सुरवातीस ४ पोलीस स्टेशन अंतर्गत येण्या्रा आय.टी कंपन्यामध्ये बडी कॉप उपक्रम सुरु करण्यात आला असुन त्यात एकुण १० व्हॉटस्ॲप ग्रुप व ५०० महीला सहभागी होत्या. पंरतु सध्या पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील ३० पोलीस स्टेशन पैकी आय.टी कंपन्या असणारे १० पोलीस स्टेशन (खडकी, विश्रांतवाडी, चतुःश्रृंगी, येरवडा, विमानतळ,चंदननगर, विमानतळ, हडपसर, कोंढवा, मुंढवा, व वानवडी) मध्ये ४२३१ बडीकॉप व्हॉटस्ॲप ग्रुप असुन त्यात एकुण ४१६६१ महीला सहभागी आहेत.**
- **उददीष्टे व वैशिष्टये :-**

  - वेगवेगळया ठिकाणी कामास असणा-या महिलांसाठी संबंधीत पोलीस स्टेशन हददीतील एका पोलीस कर्मचा-याची **बडीकॉप** म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.
  - बडीकॉप हे नेमुन दिलेल्या महिलांना कोणत्याही अतितातडीच्या मदतीसाठी २४X७ उपलब्ध राहतील.
  - अतितातडीच्या प्रसंगी बडीकॉप हे **WhatsApp** किंवा फोन याव्दारे संबंधित महिलांच्या संपर्कात राहतील.

  अतितातडीच्या प्रसंगी बडीकॉप हे स्वतः अथवा पोलीस स्टेशनचे सहकारी यांचे मदतीने पिडीत महिलेच्या मदतीस तात्काळ पोहोचतील.

- **प्रत्यक्ष कामाची पध्दत :-**

  - ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत नोकरपेशा महिलांचे प्रमाण जास्त आहे अशा पोलीस स्टेशनची निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार परिमडंळ-३ व परिमंडळ-४ मध्ये आय.टी.कंपन्या, बॅका, इतर औदयोगिक कंपन्याचे प्रमाण जास्त असल्याने त्या परिमंडळमधील सर्व पोलीस स्टेशनची निवड करण्यात आलेली आहे.

- पोलीस ठाण्यांमधील प्रत्येकी २० कर्मचा-यांची बडी कॉप म्हणुन निवड केली.सदर पोलीसांची निवड करताना ते तांत्रिकदृष्टया समक्ष असतील या गोष्टीकडे प्रामुख्याने लक्ष देण्यात आले. निवड केलेल्या पोलीस कर्मचारी यांना बडीकॉप या संकल्पनेबददल प्रशिक्षण देण्यात आले आहे.

- निवड झालेले बडीकॉप हे एक **WhatsApp** ग्रुप तयार करतील. एका गु्पमध्ये एक बडीकॉप,चौकी अधिकारी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक व १०० ते १५० महिला राहतील. ग्रुपमधील संबंधित महिला या अडचणीच्या वेळी बडीकॉप यांना **WhatsApp** किंवा फोन यादवारे संपर्क साधतील.

- प्राप्त होणा-या तक्रारीची तीव्रता लक्षात घेवुन ती एक तक्रार आहे की तातडीची मदत याचा निर्णय बडीकॉप घेतील.

- अतितातडीच्या संदेशाच्या वेळी पोलीस यंत्रणा आपल्या स्टाफसह (गरज पडल्यास) बडीकॉप यांच्या मदतीला घटनास्थळी रवाना होतील

- जेव्हा अतितातडीचा संदेश नसेल तेव्हा बडीकॉप हे पोलीस अधिका-यांशी संपर्क साधतील व संबंधीत महिला तक्रारदार यांना पोलीस स्टेशन येथे नेवुन तक्रार दाखल करण्यास मदत करतील. या संदर्भात कोणताही निष्काळजीपणा होवु नये तसेच इतर पुरुषांकडुन दिल्या जाणा-या निंदाजनक वागणुकीकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी वरीष्ठ पोलीस अधिका-यांकडुन घेतली जाईल.

- वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे बडीकॉप उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रयत्नशील राहतील. ते बडीकॅाप यांची आढावा बैठक घेवुन त्यांना सुचना देवुन मार्गदर्शन करतील. संबंधित कंपन्यांशी समन्वय साधुन सदर उपक्रमाचे नोकर पेशा महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्व पटवुन अधिकाधिक महिलांना उपक्रमात सामील करुन घेतील.तसेच बडीकॉप यांचे योग्य त्या कामगिरी व वर्तणुकीबाबत संबंधितांना कडुन प्रतिक्रिया घेवुन बडीकॉपच्या कामकाजामध्ये आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करतील.

➢ **कामाची ध्येय :-**

- सुरक्षितता ही फक्त बोलण्यात न राहता ती कृतीत उतरविणे.

- कामास जाणा-या महिलांना सुरक्षित व निर्भय वातावरण उपलब्ध करुन देणे.

- कर्तव्यावर असणा-या महिलांनी वाईट कृत्ये करणा-या व्यक्तीविरुध्द तक्रार दाखल करणे, प्रोत्साहन देवुन पोलीस यंत्रणा ही त्यांच्या मदतीसाठी २४ तास सेवेत आहे असे जाणवुन देणे.

- कोणत्याही प्रकारचे घातपाताचे प्रकार हे भविष्यात घडु नये तसेच पुण्यात काम करणा-या महिलांच्या कामाच्या ठिकाणांची विश्वासार्हता अबाधीत राखणे.

- पुण्यातील काम करण्या-या महिलांसाठी कामाच्या ठिकाणी असलेली सुरक्षितता वेगळया उंचीवर पोहोचविणे.